| अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा साक्षीपुरावा | |
|---|---|
| **सं.फौ.ख.क्र. २९९/२०२०** | **निशाणी क्र. १९/क** |
| सरकारतर्फे साक्षीदार क्र.१ यांची जबानी | **पी. डब्ल्यू. १** |
| माझे नाव – | संतोष सुपडाजी वाघ |
| वय – | ४१ वर्षे |
| व्यवसाय – | शेती |
| राहणार – | रा. चौका, ता. जि.छत्रपती संभाजीनगर |

**<u>साक्षीदाराचा सरतपास अभियोगपक्षातर्फे विशेष सहायक सरकारी अभियोक्ता</u>**

**<u>श्री. एल.डी.पागोरे यांचेमार्फत</u>**

०१. दि.०८.०४.२०२० रोजी मला पोलिसानी बोलावले नव्हते. मी हॉटेमध्ये बसलो असताना पोलिसानी माझी एका कागदावर सही घेतली. आता मला जप्ती पंचनामा दाखवण्यात आला. त्यावर अनु.क्र.१ वर माझी सही असुन त्यातील मजकुर मला माहित नाही.

***<u>साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करत नसल्याने सरकारी वकीलांनी त्यास भारतीय पुरावा कायदा कलम १५४ ( कलम १५७ भारतीय साक्ष अधिनियम )प्रमाणे उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागितली. परवानगी देण्यात येत आहे.</u>***

०२. सदर तारखेला मला पोलीसांनी मौजे चौका गावात आरोपीच्या शिवारात आईच्या मळयामध्ये जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलावले होते, हे म्हणणे खरे नाही. आरोपी यांच्या ताब्यात ५ डब्बे प्रत्येकी १५ लिटर प्रमाणे रसायन गावठी दारु तयार करण्या करीता आणले होते व ते जप्त केले, त्यातील एक लिटर बॉटली ८०० एमएल रसायन सी.ए.साठी सिलबंद करुन ठेवली होती, याबाबत मला माहिती नाही.

भाऊसाहेब हा माझ्यासोबत पंच म्हणुन हजर होता हे म्हणणे खरे नाही. मला जप्ती पंचनामा वाचुन समजुन सांगितला, त्यावर माझी, आरोपी व पंचांची सही आहे, हे म्हणणे खरे नाही. आरोपीच्या माझया गावातील आहे. आरोपीला शिक्षा होऊ नये म्हणुन आजरोजी न्यायालयात मी खोटी साक्ष देत आहे हे म्हणणे खरे नाही.

**सरतपास पुर्ण.**

**आरोपीतर्फे उलटतपास विधिज्ञ श्री. के. डब्लु गायकवाड यांनी नाकारला**

**फेरतपास काही नाही.**

**सा.वा.दा.ब.अ.क.केले.**

**श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत**

**सदरचा जबाब माझेसमक्ष नोंदवला.**

CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Digitally signed by CHANDRAKANT RAMCHANDRA PATIL
Date: 2026.06.10 16:43:57 +0530

**फुलंब्री** **(चंद्रकात आर. पाटील)**

दि. १०/०६/२०२६. **२ रे प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, फुलंब्री.**